# University of Mumbai

पुर्नमुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष,
परीक्षा विभाग/निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई - ४०० ०९८.

क. परीक्षा / पूनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष/ १३२ /२०१९

परिपत्रक :-

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित/स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण उपकेद्रांचे समन्वयक/संचालक आपल्या निदर्शनास आणून देते की, विद्यापीठ परिपत्रक क. परीक्षा / पूनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष/ १२० /२०१९ दि. ०४ फेब्रुवारी, २०१९ अन्वये, द्वितीय सत्र २०१८ मध्ये T.Y.B.Com (Sem-V) (Choice Based) या अभ्यासकमाच्या ज्या दोन विषयांची परीक्षा व T.Y.B.Sc. (Sem-V) (Credit Based व Choice Based) या अभ्यासकमाच्या एका विषयांची परीक्षा विद्यापीठाच्या वतीने संबंधित महाविद्यालयांनी घेतलेली आहे; या विषयांसाठी विद्यार्थ्यांच्या विनंती अर्जाप्रमाणे उत्तपत्रिकांचे पुर्नमुल्यांकन महाविद्यालय स्तरावर करुन पुर्नमुल्यांकनात प्राप्त गुणांच्या यादया संबंधित परीक्षेचा निकाल जाहिर झाल्यापासून ४० दिवसांच्या आत पुर्नमुल्यांकन व छायांकित प्रत कक्षाकडे हस्तपोच सादर करण्यास अवगत करण्यात आले होते.

तरी आता विद्यापीठ स्तरावर या परीक्षांचे पुनर्मुल्यांकनाचे निकाल जाहिर करण्याची प्रक्रिया सुरु झालेली असून अद्यापही ज्या महाविद्यालयांनी उपरोक्त विषयांसाठीचे पुर्नमुल्यांकनाचे गुणांच्या यादया विद्यापीठात सादर केले नसतील अशा महाविद्यालयांनी या यादया शक्य तितक्या लवकर म्हणजेच दि. ०४/०४/२०१९ पर्यंत पुनर्मुल्याकन व छायांकित कक्षात हस्तपोच सादर कराव्यात.

दि. ०४/०४/२०१९ नंतर गुणांच्या यादया स्वीकारल्या जाणार नाहीत व यामुळे भविष्यात काही तांत्रिक/ प्रशासकीय / न्यायालयीन बाबी उद्भवल्यास ~~या~~ त्यास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(डॉ. विनोद पाटील)
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

स्थळ : मुंबई
दिनांक : २६ मार्च, २०१९

अ. प्रत:-

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित/स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक व विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण उपकेद्रांचे समन्वयक/संचालक.

ब. प्रत माहितीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित:-

१. संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, मुंबई विद्यापीठ
२. सर्व उपकुलसचिव, मुंबई विद्यापीठ
३. सर्व सहायक कुलसचिव, मुंबई विद्यापीठ

क. प्रत माहितीसाठी अग्रेषित:-

१. मा. संचालक विद्यार्थी कल्याण विभाग
२. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव
३. मा. प्र. कुलगुरू यांचे स्विय सहायक
४. मा. कुलसचिव व संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचे स्विय सहायक